पन
ीन
नन
नर
३०
या
ार

**वाचले :-** १) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६

२) शासन महसूल व वनविभाग यांचेकडील ज्ञापन क्र. एलआरएफ ३१८९ प्रकरण ७७६ /ज-६ दिनांक ३० जानेवारी १९९०

३) मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांचेकडील रिटपिटीशन नंबर २७९२/२००२ मधील निकाल दिनांक २३ जुलै २००३

४) शासन नगर विकास विभाग निर्णय क्रमांक टिपीएस-१५०७ / २५२४ / प्र.क्र.२७१ / ०७ / नवी-९ दिनांक ११ जानेवारी २००८

५) शासन महसुल व वनविभागाकडील पत्र क्रमांक एस ३० / ०२ / जमीन ३१(अ) / प्र.क्र.९२ / ज.६ दिनांक १५.०२.२००८

६) मा.अध्यक्षा, नंदुरबार नगरपरिषद, नंदुरबार यांचेकडील पत्र जा.क्र.ननप / आस्था / बांध / जामा / ३४१५ / २००८ दिनांक १९.०३.२००८

---

**क्रमांक**-२०११/ब/कक्ष-२/गांवठाण/कावि/ २३५
जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
नंदुरबार, दिनांक :- ३०/०४/२०११

**आदेश**

मा. अध्यक्षा, नंदुरबार नगरपरिषद, नंदुरबार हयांनी दिनांक १९.०३.२००८ चे पत्रान्वये विनंती केलेली आहे की, नंदुरबार शहर विकास आराखड्यात इ.पी.क्र.२३ मध्ये स.नं. ३०० ची जागा नंदुरबार नगरपरिषद नंदुरबार हयांना घरकुल योजनेसाठी करणेबाबत विनंती केलेली आहे. मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार व शासनाचे आदेशानुसार स.नं. ३०० मधील जमीन वाटपाबाबत दिनांक ०६.१२.२०१० रोजी घेण्यांत आलेल्या मिटींगमध्ये सर्व संमतीने ठरल्याप्रमाणे स.नं. ३०० पैकी २.१० हे.आर क्षेत्र ट्रायबल एज्युकेशन सोसायटी नंदुरबार हयांना मंजुर करण्याचे व उर्वरित २.१० हे. क्षेत्र नगरपरिषद नंदुरबार हयांना मंजुर करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

त्यानुसार ट्रायबल एज्युकेशन सोसायटी नंदुरबार हयांना स.नं. ३००/१ व ३००/२ पैकी नंदुरबार भोणे रोडच्या पुर्वेस उत्तर पुर्व कोपऱ्यातील आरक्षणानुसार सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे (ABCD) १.४० हे.आर. तसेच भोणे रोडच्या पश्चिमेकडील दक्षिण बाजुस पुर्व-पश्चिम लांब मोकळया क्षेत्रापैकी सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे (EFGH) ०.७० हे.आर. अशी एकुण २.१० हे.आर. जमीन मंजुर करण्यात आलेली आहे.

ट्रायबल एज्युकेशन सोसायटी नंदुरबार हयांना मंजुर केलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त स.नं. ३००/१ व ३००/२ चे भोणे रस्त्याच्या पश्चिम भागातील सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे (HIJKLE) मोकळी उरलेली १.४० हे.आर. तसेच नंदुरबार-भोणे रस्त्याच्या पुर्व बाजुस सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे (MADCON) ०.७० हे.आर. जमीन अशी एकुण २.१० हेक्टर आर जमीन नंदुरबार नगरपरिषद नंदुरबार हया संस्थेस घरकुल योजनेकरीता खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येत आहे.

➢ **अटी व शर्ती :-**

१. सदर जमीनीचा वापर केवळ मंजुर प्रयोजनार्थ म्हणजे घरकुल योजना या प्रयोजनार्थ करण्यात यावा.

२. मंजुर केलेल्या जमीनीचे अतिक्रमणा पासुन संरक्षण करण्याची जबाबदारी मुख्याधिकारी नंदुरबार नगरपरिषद नंदुरबार यांची राहील.

३. मंजुर करण्यात आलेली जमीन संस्था भोगवटदार वर्ग-२ म्हणुन धारण करील व शासनाच्या पुर्व परवानगी शिवाय हस्तांतरीत / गहाण / तारण करणार नाही.

४. मंजुर करण्यात आलेल्या क्षेत्राच्या किमान १० टक्के क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्याची जोपासना करणे बंधनकारक राहील.

५. मंजुर क्षेत्रात विद्यमान नाला बुजविता येणार नाही त्यास सुरळीकरण (Nala Training) करुन घेणे बंधनकारक राहील.

६. ट्रायबल एज्युकेशन सोसायटीस मंजुर केलेल्या क्षेत्रातील अतिक्रमित झोपडया सहा महिनेचे आंत खाली कॅरुन जागा मोकळी करुन देणेत यावी.

७. उपरोक्त अटींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यांस तो शर्तभंग समजून कार्यवाही करणेत येईल.

जिल्हाधिकारी नंदुरबार

(स्वाक्षरीत/-)
(डॉ.ए.टी. कुंभार)
जिल्हाधिकारी नंदुरबार

स्थळ प्रतीवर
मा. जिल्हाधिकारी सो. यांची स्वाक्षरी असे

प्रत :- मुख्याधिकारी, नंदुरबार नगरपरिषद, नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- चेअरमन, ट्रायबल एज्युकेशन सोसायटी नंदुरबार ता.जि. नंदुरबार

प्रत :- उपविभागीय अधिकारी, नंदुरबार भाग नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.

प्रत :- उपअधिक्षक, तालुंका भुमी अभिलेख, नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- तहसिलदार नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

मुळ संचिका पृ.क्र. १ ते ४२५ सह रवाना.

जिल्हाधिकारी नंदुरबार करिता

तहसिल कार्यालय नंदुरबार